# प्रेसनोट

**पिंपरी पोलीस ठाणे हद्दितील सराईत गुन्हेगार नामे, अनिल गोरख जाधव याचे टोळीवर मोका ( महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ ) अंतर्गत कारवाई केले बाबत.**

श्री. शंकर आवताडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी पोलीस ठाणे, यांनी श्री. मंचक इप्पर, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ यांचे मार्फतीने पिंपरी पोलीस ठाणे, गुन्हा रजि. नं. १९६/२०२२ भादंवि कलम ३९५, ४२७, आर्म अॅक्ट ४(२५) या गुन्ह्याचे तपासामध्ये आरोपी नामे, (१) अनिल उर्फ संतोष उर्फ अन्या गोरख जाधव, वय ३० वर्षे, रा. सोपान नाना बालघरे यांचे रुम मध्ये, बालघरे वस्ती, कदुळवाडी, चिखली, पुणे, **(टोळी प्रमुख) याने** (२) सुरज ऊर्फ वंटया दत्तु गायकवाड, वय २२ वर्षे, रा. जयमल्हार फ्लोअर मिलजवळ, हरपळे आळी, फुरसुंगी, हडपसर, पुणे, (३) सज्जाद रियाज शेख,वय १९ वर्षे, रा. शंकरनगर कमानी जवळ, चिंचवड, पुणे, (४) सुप्रिम राजु काळे, रा. एक्साईड बॅटरी कंपनी जवळ, शंकरनगर, चिंचवड, पुणे, (५) विनायक क्षिरसागर, रा. शंकरनगर, चिंचवड, पुणे, (६) निलेश हेळवार, रा. शंकरनगर, चिंचवड, पुणे, (७) नाईटी पुर्ण नाव पत्ता माहीत नाही, यांचेविरूध्द **खुन, खुनाचा प्रयत्न, दरोडा घालणे, दरोडयाची तयारी करणे, जबर दुखापत करुन खंडणी मागणे, जबरी चोरी, वाहने तोडफोड, गैरकायद्याची मंडळी जमवून सार्वजनिक मालमत्तेची तोडफोड करणे व बेकायदेशीररित्या घातक शस्त्रे जवळ बाळगणे असे एकुण १६ गुन्हे पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयचे हद्दित दाखल असल्याचे** तसेच वरील सर्व आरोपी यांनी संघटीत गुन्हेगारी टोळी बनवून हिंसाचाराचा वापर करून स्वतःची व टोळीची समाजात दहशत निर्माण करून, वर्चस्वासाठी व आर्थिक फायद्यासाठी संघटितपणे गुन्हे करीत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचे विरूध्द महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ अंतर्गत कारवाई करणे बाबत प्रस्ताव मा. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला होता. डॉ. काकासाहेब डोळे, पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे) व श्री. पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड यांनी सदर प्रस्तावा मधील कागदपत्रांची छाननी करून त्रुटींची पूर्तता करून सदरचा प्रस्ताव आदेश पारीत करणे कामी मा. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडे पाठविला असता दिनांक ०६/०९/२०२२ रोजी मा. डॉ. संजय शिंदे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन १९९९ चे कलम ३(१) (ii), ३(४) या कलमांचा अंतर्भाव करण्याचे आदेश पारीत केलेले आहेत.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त, मा. श्री. अंकुश शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त, डॉ. संजय शिंदे, डॉ. काकासाहेब डोळे. पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), श्री. मंचक इप्पर सो., पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१, श्री. पद्माकर घनवट, सहायक पोलीस आयुक्त,गुन्हे-१, यांचे मार्गदर्शनाखाली, श्री. बाळकृष्ण सावंत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पी.सी.बी. गुन्हे शाखा, श्री. शंकर आवताडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पिंपरी पोलीस ठाणे, तसेच अंमलदार पोलीस हवालदार सचिन चव्हाण, पो.ना. व्यंकट कारभारी, पी.सी.बी. गुन्हे शाखा, पो. ना. ओंकार बंड, पिंपरी पोलीस ठाणे, यांचे पथकाने केली आहे.

**( डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उप-आयुक्त (गुन्हे).
पिंपरी चिंचवड.

CamScanner